आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता
१५ मार्च २०२५ - शनिवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- जागतिक ग्राहक हक्क दिनानिमित्त आज सर्वत्र विविध कार्यक्रम

- प्रसारण सेवा वि-नियमन विधेयक संसदेत लौकर सादर करण्याच्या दृष्टीनं एक कालमर्यादा निश्चित करण्याची संसदीय समितीची शिफारस

- अंतराळात अडकलेले नासाचे वैज्ञानिक सुनिता विल्यम्स आणि बुच विल्मोर यांना परत आणण्यासाठी 'ड्रॅगन अंतराळ यान' रवाना

- महिला प्रीमियर लीग क्रिकेटचा अंतिम सामना आज मुंबईच्या ब्रेबॉर्न स्टेडियमवर मुंबई इंडियन्स आणि दिल्ली कॅपिटल्स दरम्यान रंगणार

**आणि**

- मुंबई विमानतळावर सोन्याची तस्करी करणाऱ्या चौघांना अटक, साडेतीन कोटीपेक्षा जास्त किंमतीचं सोनं जप्त

**<><><><><>**

सशक्त ग्राहक हा मजबूत अर्थव्यवस्थेचा पाया आहे. ग्राहकांच्या हक्कांचे रक्षण करणाऱ्या आणि सर्वांसाठी चांगले भविष्य घडवणाऱ्या शाश्वत जीवनशैलीसाठी आपण वचनबद्ध होऊ या, असे प्रतिपादन राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलं आहे. आज जागतिक ग्राहक दिनानिमित्त त्यांनी जनतेला शुभेच्छा दिल्या. ग्राहक म्हणून आपण सदैव जागरूक आणि सतर्क राहणं गरजेचं असल्याचं उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हटलं आहे. कोणतीही वस्तू खरेदी करताना वस्तूंचे दर, मुदत संपण्याची तारीख, वजन इत्यादी गोष्टी तपासून पाहणं आणि पावती घेणं आवश्यक असल्याचंही ते म्हणाले.

ग्राहकांना त्यांच्या हक्कांची जाणीव करुन देण्यासाठी तसंच त्यांची दिशाभूल होऊ नये म्हणून केंद्रसरकार वचनबद्ध असल्याचं ग्राहक व्यवहार मंत्री प्रल्हाद जोशी यांनी म्हटलं आहे, जागतिक ग्राहक हक्क दिनानिमित्त आयोजित एका वेबिनारला ते संबोधित करत होते. ग्राहकांचं केवळ संरक्षणच नव्हे तर ग्राहकांची समृद्धी हे देखील सरकारचं उद्दिष्ट आहे असं ते म्हणाले. जागतिक ग्राहक हक्क दिनानिमित्त आज सर्वत्र विविध कार्यक्रम होत आहेत. ग्राहकांच्या हक्काचं रक्षण आणि इतर बाबींबद्दल जागरुकता निर्माण करण्याच्या उद्देशानं विविध उपक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे. ग्राहकांनी शाश्वत जीवनशैली स्वीकारून न्याय्य पध्दतीनं वाटचाल करण्याला प्रोत्साहन द्यावं, अशी आजच्या दिवसाची मध्यवर्ती संकल्पना आहे.

**<><><><><>**

मतदार यादीत फेरफार झाल्याच्या आरोपांच्या पार्श्वभूमीवर मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी येत्या मंगळवारी एक बैठक बोलावली आहे. या बैठकीत केंद्रीय गृह सचिव, कायदा विभागाचे सचिव, तसंच आधार प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्यासोबत मतदार ओळखपत्र आधार ओळखपत्राला जोडण्याबाबतच्या मुद्द्यावर विस्तृत चर्चा होईल. मुख्य निवडणूक आयुक्तांनी गेल्या ४ मार्चला झालेल्या सी ई ओ संमेलनात सर्व राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांना अशा प्रकारची जोडणी करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्याचे निर्देश दिले होते. मतदार यादी आधार ओळखपत्रांना ऐच्छिकरीत्या जोडण्याची तरतूद या संदर्भातल्या कायद्यात आहे.

**<><><><><>**

प्रसारण सेवा वि-नियमन विधेयक संसदेत सादर करण्यासाठी एक कालमर्यादा निश्चित करण्याची शिफारस संसदीय समितीने सरकारला केली आहे. या विधेयकातल्या काही तरतुदींना विरोध झाल्यामुळे याला गेल्यावर्षी स्थगिती दिली

होती. भाजपा खासदार निशिकांत दुबे यांच्या अध्यक्षतेखालच्या दळणवळण आणि माहिती तंत्रज्ञानविषयक स्थायी समितीने ही सूचना दिली आहे. या क्षेत्रातील तज्ज्ञांशी सल्लामसलत केल्यानंतर  विधेयकाचा अंतिम मसुदा तयार केला जाईल, असं माहिती आणि प्रसारण मंत्रालयानं १७ जानेवारी रोजी समितीला कळवलं होतं.

<><><><>

मराठवाडा आणि विदर्भातल्या शेतकरी आत्महत्या हा चिंतेचा विषय असून केंद्र सरकारने शेतकऱ्यांच्या मदतीसाठी धोरण आखायला हवं असं ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी म्हटलं आहे. २०२४ मधे राज्यात २ हजार ६३५ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याची माहिती राज्य मदत आणि पुनर्वसन विभागाने जाहीर केल्याच्या पार्श्वभूमीवर पवार यांनी बारामती इथं वार्ताहरांशी बोलताना हे आवाहन केलं. शेतीमधे क्रांती होत आहे, ऊस लागवडीसाठी लवकरच कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर केला जाईल असं पवार म्हणाले.

<><><><>

भारताच्या परकीय चलन साठयात सात मार्च रोजी संपलेल्या आठवड्यात १५ अब्ज २६ कोटी डॉलरची वृद्धी झाली असून परकीय चलन साठा आता ६५३ अब्ज ९६ कोटी डॉलर पेक्षा अधिक झाला आहे. रिझर्व्ह बँकेच्या साप्ताहिक आकडेवारीनुसार परदेशी चलन १३ अब्ज ९३ कोटी डॉलर वरून वाढ झाल्यानं ५५७ अब्ज २८ कोटी डॉलर पेक्षा अधिक झालं आहे. सोन्याच्या साठ्यात देखील गेल्या आठवड्यात एक अब्ज डॉलरनं वाढ झाली असून भारताकडचा सोने साठा आता ७४ अब्ज ३२ कोटी डॉलर पेक्षा अधिक झाला आहे.

<><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी येत्या ३० मार्च रोजी आकाशवाणी वर ‘मन-की-बात’ कार्यक्रमाच्या माध्यमातून देश-विदेशातल्या नागरिकांशी संवाद साधणार आहेत. दर महिन्याच्या शेवटच्या रविवारी सादर होणाऱ्या या कार्यक्रमाचा हा १२० वा भाग

असेल. नागरिकांनी त्यांचे विचार आणि सूचना येत्या २८ मार्च पर्यंत १८००-११-७८०० या टोल फ्री क्रमांकाद्वारे पाठवाव्यात, असं आवाहन करण्यात आलं आहे. आकाशवाणी, दूरदर्शन, तसंच प्रसारण मंत्रालयाच्या युट्युब चॅनल वरून मन-की-बात या कार्यक्रमाचं थेट प्रक्षेपण होणार असून त्यानंतर लगेचच विविध प्रादेशिक भाषांमधून या कार्यक्रमाचा अनुवाद प्रसारित करण्यात येईल.

<><><><>

वेव्हज् अर्थात जागतिक ऑडिओ व्हिज्युअल आणि मनोरंजन शिखर परिषद १ मे पासून मुंबई इथं सुरू होत आहे. विविध क्षेत्रातल्या तज्ज्ञांना एकाच व्यासपीठावर येण्याची संधी वेव्हज् उपलब्ध करून देणार आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारत माध्यम आणि मनोरंजन क्षेत्रात आपली ओळख निर्माण करत आहे. याच प्रयत्नांचा भाग म्हणून वेव्हजचं आयोजन करण्यात आलं आहे.

<><><><>

गेल्या एक वर्षापासून अंतराळात अडकलेले नासाचे वैज्ञानिक सुनिता विल्यम्स आणि बुच विल्मोर यांना परत आणण्यासाठी ड्रॅगन अंतराळ यान घेऊन जाणारं फाल्कन ९ रॉकेट काल संध्याकाळी अंतराळात रवाना झालं. नासा आणि स्पेसएक्सच्या क्रू १० मिशन अंतर्गत हे यान काल अंतराळात निघालं.  सुनिता विल्यम्स आणि बुच विल्मोर गेल्या वर्षी जून महिन्यात आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकात गेले हो◌ेते, मात्र अंतराळ यानात तांत्रिक बिघाड झाल्यानं त्यांना परतता आलं नाही. त्यांना परत आणण्यासाठी नासा प्रयत्न करत आहे. सर्व काही ठरल्याप्रमाणे झालं तर सुनिता विल्यम्स, बुच विल्मोर १९ मार्चला पृथ्वीवर परततील, असं नासानं म्हटलं आहे.

<><><><>

महिला प्रीमियर लीग क्रिकेट स्पर्धेच्या  अंतिम सामन्यात  आज दिल्ली कॅपिटल्स संघाची गाठ मुंबई इंडिअन्सशी पडणार आहे. या स्पर्धेत दिल्ली कॅपिटल्स संघ

तिसऱ्यांदा अंतिम फेरीत पोहोचला आहे. मुंबईत ब्रेबॉर्न स्टेडिअमवर संध्याकाळी आठ वाजता या सामन्याला सुरुवात होईल.

**<><><><><>**

मुंबईत सीमाशुल्क विभागाने दोन वेगवेगळ्या कारवायांमध्ये सोन्याची तस्करी करणाऱ्या चौघांना अटक केली असून त्यांच्याकडून तस्करीचं साडेतीन कोटीपेक्षा जास्त किंमतीचं सोनं जप्त केलं आहे. सीमाशुल्क विभागाच्या अधिकाऱ्यांनी गुरुवारी रात्री संशयावरून एकाला ताब्यात घेतलं आणि त्याची झडती घेतली असता सोन्याची भुकटी असलेली पाकिटं त्याच्याकडे सापडली. त्याने दिलेल्या माहितीच्या आधारे पोलिसांनी इतर दोघांनाही अटक केली आणि त्यांच्याकडून सोनं जप्त केलं.

**<><><><><>**

राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार जानेवारी २०२४ ते डिसेंबर २०२५ या कालावधीत मुदत संपणाऱ्या लातूर जिल्ह्यातील अहमदपूर तालुक्यातील तीन ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुका, तसंच जिल्ह्यातील नवनिर्मित आणि मागील निवडणुकांमध्ये चुकीची प्रभाग रचना झाल्यामुळे निवडणुका न होवू शकलेल्या ग्रामपंचायती तसंच २८ फेब्रुवारी २०२५ अखेर रिक्त झालेल्या सदस्य आणि थेट सरपंच पदांच्या पोटनिवडणुकीसाठी पारंपरिक पद्धतीने मतदार यादीचा कार्यक्रम राबवण्यात येणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी कार्यालयाने दिली आहे. सार्वत्रिक निवडणुका होणाऱ्या ग्रामपंचायतींमध्ये अहमदपूर तालुक्यातील रुई, राळगा आणि वरवंटी या ग्रामपंचायतींचा समावेश आहे

**<><><><><>**

जगद्गुरु संत तुकाराम महाराज यांच्या सदेह वैकुंठ गमन अर्थात बीज सोहळा उद्या, रविवारी क्षेत्र देहू इथं होत आहे. यंदा तीनशे पंच्याहत्तरवा बीज सोहळा असून या सोहळ्यासाठी राज्यभरातून येणाऱ्या लाखो भाविकांना सोयी-सुविधा देण्यासाठी

देहू नगरपंचायतीकडून जय्यत तयारी करण्यात आली आहे. गावात स्वच्छतेची कामं करण्यात आली असून इंद्रायणी नदीतील जलपर्णी काढण्यात आली आहे. सध्या देहू, माळवाडी, विठ्ठलवाडी आणि इंद्रायणी नदीकाठी गाथा पारायण सोहळा आणि अखंड हरिनाम सप्ताह सुरू आहे. या सोहळ्यासाठी नगरपंचायत कार्यालयात आपत्ती व्यवस्थापन केंद्र सुरू करण्यात येणार आहेत.

**<><><><><>**

होळी लहान करा गोवऱ्या दान करा...या कोल्हापूर महापालिकेच्या आवाहनाला प्रतिसाद देत कोल्हापूर शहर परिसरातील तरुण मंडळ आणि सामाजिक संस्था यांच्या वतीनं १ लाख ७८ हजार ६०५ गोवऱ्या दान करण्यात आल्या. गेल्या दोन दिवसांत होळी पौर्णिमा सणानिमित्त सामाजिक कार्यकर्ते, सेवाभावी संस्था तसंच दानशूर व्यक्तींनी १ लाख ७८ हजार ६०५ गोवऱ्या कोल्हापूर महानगरपालिकेच्या स्मशानभूमीसाठी दान देण्यात आल्या.

**<><><><><>**

राज्याच्या बहुतांश भागात किमान तापमानात सरासरीच्या तुलनेत लक्षणीय वाढ दिसून येत आहे. विदर्भातील अनेक जिल्ह्यात काल पारा ३९ ते ४० अंशांच्या आसपास होता; सोलापुरातही काल तापमान ४१ अंश सेल्सियसपर्यंत नोंदवलं गेल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

**//<><><><><>//**